# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 16/01/2021 (शनिवार)
(दुपार)

---

### दुखापत

1) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 8 कि. मी अंतरावर मौजा साळवा येथे दिनांक 15/01/2021 चे 20:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजहंस माधवजी केळझरकर, वय 50 वर्ष, रा. साळवा, ता. कुही हे घरी हजर असतांना आरोपी 1) कमलाकर नथ्थुजी केळझरकर, वय 52 वर्ष व इतर 2 हा आरोपी हे दारू पिवुन जागेच्या वादावरून शिवीगाळ करू लागले. फिर्यादीची मुलगी नामे– स्नेहा केळझरकर, वय 18 वर्ष ही तिथे झगडा भांडण सोडविण्याकरीता आली असता आरोपी क्र. 2 व 3 यांनी धक्का दिल. यानंतर आरोपी क्र. 1 याने फिर्यादीच्या मुलीला डोक्याला लोखंडी सळाख मारली व अश्लिल शब्दात शिवीगाळ केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 326, 294, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री अनिल देरकर हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 15 कि. मी अंतरावर काचुरवाही येथे दिनांक 14/01/2021 चे 19:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– श्रीकांत कमलाकर गायधने, वय 28 वर्ष, रा. काचुरवाही व आरोपी कमलाकर गायधने, रा. काचुरवाही हे वडील, मुलगा असून फिर्यादी हा जेवण करून घरी बसला असता आरोपीने जेवणाचे भांडे धुण्याचे कारणावरून शिविगाळ करू लागला व फिर्यादी भांडे उचलत असता आरोपीने घरातील सुरा घेवुन फिर्यादीच्या उजव्या बाजुच्या छातीखाली मारून फिर्यादीला गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पो.उप.नि श्री कोळेकर 9834323960 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर